# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिध्दी निवेदन दि.०५.०८.२०१७.(चौथी गुणवत्ता यादी).

**इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ साठी चौथी गुणवत्ता यादी दिनांक ०६.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता जाहीर होणार होती परंतु नियोजित वेळेपुर्वीच दि. ०५.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. तथापि, प्रवेश घेणेबाबतचे वेळापत्रक यापुर्वी ठरल्याप्रमाणे असणार आहे.**

**इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये द्वारा कला, विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी (HSVC)या शाखेत प्रवेश दिले जाणार आहेत.**

**चौथ्या गुणवत्ता यादीनुसार सांख्यिकी माहिती**

| अ.क्र. | तपशिल | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | चौथ्या गुणवत्ता यादीसाठी पात्र/शिल्लक अर्ज संख्या | २२०६१ |
| २ | चौथ्या गुणवत्ता यादीत दिलेले प्रवेश | १८००५ |
| ३ | पहिला पसंतीक्रम मिळालेले विद्यार्थी | ७८३९ |
| ३ | चौथ्या गुणवत्ता यादीत दिलेल्या पसंतीक्रमानुसार प्रवेश न मिळालेली विद्यार्थी संख्या | ४०५६ |

कला, विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी (MCVC) शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम) साठी जेवढया प्रवेश इच्छुकांनी अर्ज केला होता. त्यांना दुस-या फेरीत शाखा व माध्यमनिहाय आलेल्या प्रवेश अर्जानुसार व विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंती क्रमांक व गुणवत्तेनुसार पसंतीक्रमनिहाय सांख्यिकी माहिती (१ ते १० पसंतीक्रम) :-

| शाखा | माध्यम | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला/ विज्ञान/ वाणिज्य/ एमसीव्हीसी (MCVC) | /मराठी /इंग्रजी | ७८३९ | ३३१८ | २०३८ | १४२८ | १०४६ | ७५३ | ५८६ | ४१८ | ३१८ | २६१ | १८००५ |
| | एकूण | ७८३९ | ३३१८ | २०३८ | १४२८ | १०४६ | ७५३ | ५८६ | ४१८ | ३१८ | २६१ | १८००५ |

**चौथ्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १ | ०६.०८.२०१७ | सायंकाळी ५.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची चौथी गुणवत्ता यादी जाहिर करणे परंतु नियोजित वेळेपुर्वीच दि.०५.०८.२०१७ सायंकाळी ५.०० वाजता विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. |
| २ | ०७.०८.२०१७<br>०८.०८.२००७ | स.१०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत | दि. ०७.०८.२०१७ रोजी ज्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ विद्यालयांना सुट्टी असणार आहे ते महाविद्यालय वगळून इतर महाविद्यालयात प्रवेश देण्याचे काम सुरु राहणार आहे. |
| | ०९.०८.२०१७ | सकाळी १०.०० ते २.०० वाजेपर्यंत | १. केंद्रीय प्रवेशाच्या चौथ्या गुणवत्ता यादीतील प्रवेश घेणे.<br>२. कोटा प्रवेश रिक्त जागांवर प्रवेश घेणे. |

**विद्यार्थी पालकांसाठी सूचना:-**

१) पसंतीक्रम क्र-१ अॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीचे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले असल्यामुळे **दि ०७.०८.२०१७ ते ०८.०८.२०१७ (या कालावधीत सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत) व दि. ०९.०८.२०१७ या कालावधीत सकाळी १०.०० ते २.०० वाजेपर्यंत** कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित करणे बंधनकारक आहे. जे विद्यार्थी १ ल्या पसंतीक्रमाचे कनिष्ठ महाविद्यालय अॅलॉट झालेले असतांना देखील प्रवेश घेणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना पुढील फेरीसाठी त्यांचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा क्रमांक व इ.१० वी बोर्डाचा बैठक क्रमांक(Seat) प्रतिबंधीत (Block)केले जाणार आहे.

२) पसंतीक्रमांक २ ते १० अॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना जर तो प्रवेश मान्य असेल तर त्यांनीही दिलेल्या वेळेत ऑनलाईन प्रवेश घेणे आवश्यक आहे.

३) पसंतीक्रमांक २ ते १० अॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना जर तो प्रवेश मान्य नसेल तर अशा विद्यार्थ्यांनी पुढील गुणवत्ता यादीची वाट पाहावी. अॅलॉट झालेला प्रवेश तात्पुरत्या स्वरुपात अथवा कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश रद्द करणे अशा कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही.

४) पसंतीक्रमांक २ ते १० पैकी कोणत्याही पसंतीक्रमांकाचे कॉलेज अॅलॉट झालेले असल्यास व कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश घेतलेला असल्यास व नंतर प्रवेश काही कारणास्तव रद्द (Cancelled) केला असल्यास अशाही विद्यार्थ्यांचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा क्रमांक व इ.१० वी बोर्डाचा बैठक क्रमांक(Seat) प्रतिबंधीत (Block)केले जाणार आहे. त्यामुळे प्रवेश घ्यावयाचा आहे किंवा नाही हे पालक व विद्यार्थी यांनी विचारपूर्वक ठरवुनच निर्णय घ्यावा. त्यानंतर कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) प्रवेशाच्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयांसाठी सूचना :-**

१) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन अॅलॉट झालेल्या यादीप्रमाणे विद्यार्थी/पालक कॉलेजमध्ये आल्यानंतरच त्यांचे प्रवेश नियोजित वेळेत ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थी किंवा पालक कॉलेज मध्ये प्रवेशासाठी न आल्यास, आवश्यक ती कागदपत्रे सादर न करताच कोणत्याही विद्यार्थ्याला परस्पर ऑनलाईन अॅडमिट करु नये.

३) पहिली गुणवत्ता यादी, दुसरी गुणवत्ता यादी, तिसरी गुणवत्ता यादी व चौथी गुणवत्ता यादी या याद्यांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पहिल्या पसंतीक्रमाचे कॉलेज मिळूनही त्या-त्या वेळी प्रवेश घेतलेले नाहीत तसेच घेणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे इ.१०वी परीक्षेचा सीट नंबर (Seat No) व वर्ष ब्लॉक (Block) करण्यात आलेले आहेत. त्यामुळे चौथ्या फेरीसाठी या विद्यार्थ्यांना सहभागी होता आलेले नाही, त्याबाबत सूचना इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या संकेतस्थळावर व पुणे-पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील वर्तमानपत्रात प्रसिध्दी निवेदन देण्यात येईल.

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१